International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासींची लोक संस्कृती व जीवनमूल्य

**डॉ. सुनिता अंबादास बोराडे**
*मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय बीड.*
*Corresponding Author –* डॉ. सुनिता अंबादास बोराडे
DOI - 10.5281/zenodo.17656824

जंगलाचा मी रहिवाशी
नातं माझं निसर्गाशी.
झाडे, वेली, पशु पक्षी सारे
आहेत माझे मित्र खरे,
मंजुळ पावरी वाजे
आम्ही आहोत जंगलाचे राजे!!

9 ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी जगभरात आदिवासी बांधव एकत्र येऊन आपापल्या संस्कृती प्रमाणे वेशभूषा, नृत्य, गायन करून हा दिवस साजरा करतात. मानवाची जसजशी उत्क्रांती होत गेली तसतसा माणूस पृथ्वीवर सर्वत्र फिरू लागला प्रवास करू लागला. तेथील वातावरणाशी त्याने जुळून घेतले. हळू हळू शब्द , बोली, पुढे भाषा संवाद अशी उत्क्रांती होत गेली. आजही जगाच्या कानाकोपऱ्यात आणि जमाती आपली बोलीभाषा, रूढी परंपरा जपत निसर्गाच्या सानिध्यात राहत आहेत. आधुनिक दुनियेच्या झगमगटापासून आजही अनेक लोक कोसो दूर आहेत. अनेक वर्षानंतर संयुक्त राष्ट्रसंघासमोर जी बाब समोर आली ती अतिशय धक्कादायक होती. ती बाब म्हणजे जगातील अनेक मूळनिवासी समूहाने निसर्ग जपण्याचे मोलाचे कार्य केले आहे. परंतु आधुनिक समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ न शकल्यामुळे या आदिम जमाती शिक्षण, आरोग्य, रोजगार व इतर अनेक सोयी सुविधा पासून वंचित राहिले आहेत. या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने 9 ऑगस्ट 1994 या दिवशी जागतिक आदिवासी दिवस म्हणून घोषित केला.

तेव्हापासून जगभरातील आदिवासी बांधवांना मूलभूत सुविधा व त्यांचे हक्क मिळावेत यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न सुरू झाले. भारतात मात्र संविधानानुसार 1950 पासूनच, आदिवासी जमातीच्या विकासाची भूमिका समोर ठेवून तरतूद करण्यात आली होती. संविधानामधील सर्वाधिक अनुच्छेद आदिवासी समाजाच्या हित व रक्षणासाठी आहेत. आदिवासी समाजाची एक स्वतंत्र जीवनशैली ,रूढी परंपरा,व सामाजिक कायदे आहेत.

पाखरा संगे गातो गीत
नदी नाल्यांचे आहे संगीत
जंगलाचा मी रहिवाशी
या देशाचा मी मूलनिवासी.

विश्वाच्या कानाकोपऱ्यात, डोंगरदऱ्या, निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्यांना आदिवासी म्हटले जाते. भारत क्षेत्र त्याला अपवाद नाही. भारतातील

आदिम समाज म्हणून आदिवासी समाजाकडे पाहिले जाते. डॉ. प्रमोद मुनघाटे म्हणतात. "पृथ्वीच्या पाठीवरील आदिवासी हेच मूळनिवासी आहेत. अशा मूळनिवासी असणारे आदिवासींची स्वतंत्र अशी जीवन पद्धती आहे. स्वतःची स्वतंत्र संस्कृती आहे. त्या संस्कृतीवर आधारित त्यांच्या रुढी, परंपरा, श्रद्धा आहेत ज्याचे पालन ते कसे करतात. त्यांच्या या जगण्यात उच्च नीचता नाही. सर्वांना समान दर्जा आहे. समान स्वातंत्र्य आहे. शिवाय स्त्रियांना विशेष अधिकार आहेत.

**आदिवासीची स्वतंत्र संस्कृती :**

आदिवासींची देवदेवता कुल गोत्र, जीवन जाणिवा, रूढी परंपरा या सर्वांनी मिळून त्यांची संस्कृती तयार झाली आहे. ही संस्कृती समृद्ध, प्रेरणादायी व आनंददायी आहे. त्यामुळे त्यांचे माता, माती व माणसावर जसे प्रेम आहे तसे स्वतःच्या संस्कृती वरही विलक्षण प्रेम आहे. आदिवासींच्या संस्कृतीत मानव महत्वाचा आहे. कारण त्यांच्याद्वारे समूह तयार होतो तो समूह या संस्कृतीचे प्राणपणाने रक्षण करतो. संस्कृतीने ठरवून दिलेल्या नियम प्रत्येक जण पाळत असतो. डॉ.पुष्पाताई गावित म्हणतात. "आदिवासींचे जीवन हे परस्पर सहकार्याने चालत असते edसामाजिक ऐक्य आणि सहकार ही त्यांची प्रवृत्ती असते.

**आदिवासी च्या व्याख्या :**

**१) डब्ल्यू .जे. पेरी.**

"समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी म्हणतात".

**२) तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी**

नागर संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेला संबंधित प्रदेशातील रहिवासी म्हणजे आदिवासी होय. आदिवासींची भाषा एक समान सूत्रात बंदिस्त आहे. ती स्थळ काळाच्या मर्यादा भेदून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. संघ भावना व निसर्ग प्रेम ही त्यांची जीवनमूल्य आहेत.

**आदिवासींचे जीवनमान :**

"वेश धरावा बावळा परी अंतरी नाना कळा" ही संतोक्ती आदिवासींच्या बाबतीत तंतोतंत लागू पडणारी आहे. बाह्य अंगाने साधी दिसणारे आदिवासी अंतकरणाने अतिशय प्रेमळ आहेत. सत्यनिष्ठा आणि सदाचारी आहेत. आदिम जमाती बद्दल या देशातला सर्वसामान्य व मध्यमवर्गीय सुशिक्षित लोकांचा दृष्टिकोन हा अत्यंत पूर्वग्रह दूषित उपासात्मक स्वरूपाचा आहे. त्यांचे खानपान राहणीमान, आचार विचार, प्रथा परंपरा या सर्वच बाबतीत ते मागासलेले आहेत असे त्यांना वाटते. पण आदिवासींनी स्वतःच्या कर्तुत्वाने हा गैरसमज फोडून काढला आहे. त्यांना मिळालेल्या प्रत्येक संधीचे त्यांनी सोने केले आहे. आजच्या कृषी क्रांती त्यांचा सिंहाचा वाटा आहे निसर्गावर निष्ठा राखण्यात ते शीर्षस्थानी आहेत व माणुसकी जपण्यात ते अग्रभागी आहेत.

**आदिवासींची जीवनमूल्य :**

आदिवासींची स्वतःची स्वतंत्र अशी काही जीवनमूल्य आहेत. त्यांचे जगणे जंगलाच्या सानिध्यात असल्यामुळे नागरी जीवनातील धावपळ त्यांच्या जीवनात नाही. जंगलातील निसर्गदत्त नितीनियमांचे पालन करीत ते जपतात हे जीवन अनौपचारिक आहे. त्यांच्या काही श्रद्धा आणि परंपरा आहे त्यांचे काटिकोर

पालन करीत ते आपले जीवन जगतात. हे जगणे व्यक्ती केंद्रित नसून समूहकेंद्रित आहे. समूहाचा विचार प्रधान मानून जगल्यामुळे परस्परांचे सुख दुःख ते वाटून घेतात. एकमेकांना जपतात. तसे जंगलाला ही जपतात. जंगलावर आपले जीवन अवलंबून आहे याची सदैव जाणीव बाळगतात. फुले, फळे याबरोबरच कंदमुळे नाना फळे जंगलातील पशुपक्षी आपली भूक भागवतात म्हणून जंगलातील चराचरावर ते अतिशय प्रेम करतात. जंगलात त्यांची स्वायत्तता, स्वतंत्रता आणि स्वयंपूर्णता अभातीत असल्यामुळे ते स्वतःला. 'जंगलाचे राजे'म्हणतात जंगलावर जसा आपला अधिकार आहे, तसा जंगलातील प्राण्यांचाही आहे ही सौजन्यशीलता ते सदैव दाखवितात. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने जंगलाचे राजे शोभतात आदिवासी समाजाकडून खूप काही घेण्यासारखे आहे त्यांचे संस्कृती ही मागासलेली नसून सुशिक्षित नसून ती सुसंस्कृत आहे.

**आदिवासी संस्कृतीची काही प्रमुख वैशिष्ट्ये :**

**1) निसर्गावर आधारित:**

आदिवासी संस्कृती निसर्गावर आधारित आहे. निसर्गातील प्रत्येक गोष्टीला ते महत्त्व देतात. निसर्गावर त्यांचं प्रेम आहे निसर्गाला ते देव मानतात. व त्याची पूजा करतात निसर्ग हा त्यांच्या जगण्याचा आधार आहे. त्यांचे जीवन निसर्गावर अवलंबून असल्यामुळे ते निसर्गाला आपलं सर्वस्व मानतात.

**2) सामूहिक जीवन:**

आदिवासी समाजात सामूहिक जीवनशैलीला महत्व दिले जाते. समोर करून राहणे समूहामध्ये एकीचे वातावरण असते समूहाला ते आपले कुटुंब म्हणतात.

**3) विशिष्ट भूप्रदेश:**

भारतामध्ये अनेक आदिवासी जमाती आहेत. एका आदिवासी जमातीची एका विशिष्ट भूप्रदेशातच वस्ती असते. उदा. ठाणे जिल्ह्यातील डहाणूचा परिसर सोडून अन्यत्र आदिवासी जमातीची वस्ती आढळत नाही.

**4) कमी लोकसंख्या:**

आदिवासी समूहाचा आकार लहान असतो आदिवासींच्या काही गावांमध्ये व्यवस्थेमध्ये 20_25 घरे म्हणजेच शंभर ते दीडशे लोक राहत असतात. दुर्गम परिसर व समूहाची सदस्य संख्या कमी यामुळे त्यांच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्र अत्यंत मर्यादित असते.

**5) विवाह पद्धती:**

विवाह हे केवळ वधू वर या दोन व्यक्तींना जोडणारे बंधन नसते तर ते दोन कुटुंबांना कुळांना जोडणारी साधन आहे अशी आदिवासी समाजाची धारण आहे. या समूहात वधूपित्याला योग्य ते मूल्य देऊन वधु प्राप्त केली जाते. वधू मूल्य देणे ही वधू जवळ असलेल्या पात्रतेची व गुणांची पावती होय.

**6) मौखिक परंपरा:**

आदिवासी लोक हे शिक्षणापासून वंचित असल्यामुळे आदिवासी समाजात लिखित भाषेपेक्षा मौखिक परंपरेला महत्त्वाचे स्थान आहे. गोष्ट सांगणे कथा सांगणे गाणी म्हणून इत्यादी माध्यमातून ते आपले ज्ञान व संस्कृतीचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे करतात.

**7) औद्योगिकीकरणापासून वंचित:**

कमी औद्योगीकरण झाली का भाग आदिवासी समाज जंगलात राहत असल्यामुळे शिक्षणापासून वंचित असल्यामुळे ते लोक औद्योगीकरणापासून वंचित आहेत समाजातील सुधारित जगापासून ते दूर आहेत.

**8) सांस्कृतिक विविधता:**

भारतामध्ये विविध आदिवासी जमाती आहेत प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतःची अशी काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत त्यामुळे त्यांच्या संस्कृतीमध्ये विविधता दिसून येते.

अशाप्रकारे आपणाला आदिवासी समाजाची काही वैशिष्ट्ये व जीवनमूल्य सांगता येतील.

**संदर्भ ग्रंथ:**

1) मुनघाटे डॉ प्रमोद: संपादक_ आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा_प्रतिमा प्रकाशन , पुणे.
2) गावित, डॉ.पुष्पा यशवंत: पश्चिम खानदेशातील आदिवासी लोक साहित्य, प्रशांत पब्लिकेशन जळगाव प्रथम आवृत्ती 2011
3) मांडे, डॉ. प्रभाकर_ भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
4) वाल्हेकर, डॉ. ज्ञानेश्वर_आदिवासी साहित्य एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.